श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे,

# श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

स्थापना-1971

2968, 'सी' दसरा चौक, कोल्हापूर - 416002

Reaccredited by NAAC with Grade 'A' (CGPA-3.13)
Website : www.shahajicollege.ac.in
Prin. Dr. R. K. Shanediwan - M.A. B.Ed. Ph.D.NET (Marathi) B.J.

Affiliated to - Shivaji University, Kolhapur-416 004, Maharashtra
E-mail : sscm34.cl@unishivaji.ac.in / shahaji_college_kop@yahoo.com
Phone : (O) (0231) 2644204, (M) 9960995853

जा.क्र. एस.एस.सी.एम./ / /2024-25

दि. : 2 4 FEB 2025

## स्त्री व्यक्तीमत्व विकास समिती

## नोटीस

स्त्री व्यक्तीमत्व विकास समिती व आय.क्यु.ए.सी. यांच्या संयुक्त विद्यमान ८ मार्च **'जागतिक महिला दिन'** निमित्त निबंध स्पर्धा आयोजित केल्या आहेत. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले निबंध दि. ३ मार्च २०२५ पर्यंत डॉ. **सारिका मोरे** व डॉ. **सुरेखा मंडी** यांच्याकडे जमा करावेत.

**निबंधाचे विषय :**

१) महिलांची समाजातील बदलती भूमिका

२) जागतिक बदलामधील महिलांचा सहभाग

३) महिलांचे आर्थिक स्वावलंबन : एक प्रेरणा

४) स्त्री : काल, आज आणि उद्या

५) आजच्या स्त्री समोरील समस्या आणि आव्हाने

६) स्त्री समानता : एक काळाची गरज

७) आजचा समाज आणि स्त्री सुरक्षितता

८) ऐतिहासिक स्त्री व्यक्तीमत्वे : संपन्न वारसा

९) जगाचे नेतृत्त्व करणाऱ्या विविध क्षेत्रातील स्त्रिया

१०) स्त्री जगाचा उद्धार करी

**नियम व अटी :**

१) निबंधाची शब्द मर्यादा १५०० शब्द राहिल.

२) वेळेत जमा होणाऱ्या निबंधाचा पारितोषिकासाठी विचार केला जाईल.

३) अनुक्रमे उत्कृष्ट तीन व उत्तेजनार्थ दोन पारितोषिके दिली जातील.

**डॉ. एस. एस. राठोड**
अध्यक्ष, स्त्री व्यक्तीमत्व विकास समिती

**डॉ. आर. के. शानेदिवाण**
प्राचार्य,
श्री शहाजी छत्रपती
महाविद्यालय, कोल्हापूर.

Shri Shahu Chhatrapati Shikshan Sanstha's
SHRI SHAHAJI CHHATRAPATI MAHAVIDYALAYA
2968, 'C' DasaraChowk, Kolhapur-416 002.
Estd. 1971
Affiliated to - Shivaji University, Kolhapur-416 004, Maharashtra
Accredited by NAAC (3rd Cycle) with Grade 'A' (CGPA-3.13)
Website : www.shahajicollege.ac.in
E-mail : sscm34.cl@unishivaji.ac.in
Prin. Dr. R. K. Shanediwan - M.A. B.Ed. Ph.D.NET (Marathi) B.J.
Phone : (O) (0231) 2644204, (M) 9960995853

# Programme Report: 2024-2025

**Day:** Monday **Date:** 03/03/2025 **Time:** ________

1. **Name of the Department** : Women Empowerment Cell
2. **Name of the Programme** : Essay writing competition
3. **Objectives of the Programme** : 1) To demonstrate students, their writing talent.
   2) To identify critical thinking & writing skills of students
4. **Outcomes of the Programme** : 1) Students will be able to develop their writing skills
   2) It also develops to develop students critical thinking.
5. **Brief Summary of the Programme:** Women Empowerment Cell organize 'Essay Writing Competition' on the occassion of 'International Women's Day' on Monday 3rd March 2025. Total 19 students were participated in it. By writing essays on the topics like "Changing role of women in society", "Women: Past, Present and Future," 'Present Society and Women Security', 'Various Women leading in various fields of the world' in it respectively three number and two complimentory prizes were given to best essays.

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

नाव :— मनाली शामराव भोजणे

वर्ग :— बी.ए. भाग एक

निबंध लेखनाचा विषय :— आजचा समाज आणि स्त्री सुरक्षितता

# आजचा समाज आणि स्त्री सुरक्षितता

स्त्री जन्मा ही तुझी कहाणी
ओठी हासू अन् नयनी पाणी
कर्तृत्व सिद्धता हे स्वप्न मनी
कर्तव्यपूर्ती ठेवी सदा ध्यानी
तरीही मनी एक प्रश्न रुतनी
स्त्री सुरक्षितता आहे का जनी
उत्तर याचे सांगा देईल का कोणी
स्त्री जन्माची ही अजब कहाणी ||

वरील काव्यपंक्तीवरून आपल्या मनी हा एकच विचार येतो खरच आजची स्त्री सुरक्षित आहे का ? खरतर याच उत्तर त्यातच लपलेला आहे की आजची स्त्री सुरक्षित नाही. आज 21 व्या शतकातील स्त्री आपल्या कर्तृत्वाने उंच आकाशी झेप घेत आहे. परंपरागत बंधने झुगारून फक्त चूल आणि मूल एवढेच न करता ती आपल्यातील कला ओळखून त्यास आपल्या मेहनतीची जोड देऊन, नाविन्याची कास धरून आपले कर्तृत्व आणि कर्तव्य एकाचवेळी सिद्ध करित आहेत.

परंतु एवढी प्रगती स्त्रियांनी करूनही जेव्हा आपण आजूबाजूला घडणाऱ्या घटना ऐकतो, वर्तमानपत्र वाचतो, टी.व्ही वरील बातम्या पाहतो आणि मग प्रश्न पडतो खरच स्त्री सुरक्षित आहे का? ह्या अशा परिस्थितीमुळेच तर आजही मुलगी असो वा स्त्री घराबाहेर पडली तरी घरचे विचारतात कुठे जातेस ? कधी येणार ? एक ना अनेक प्रश्न ....... खरे तर हा त्या मुलीवरील अविश्वास नसतो तर आपल्या मुलीची वाटणारी काळजी असते.

आपण स्त्रीची अनेक रूपे पाहतो. कधी ती आई असते तर कधी ताई, कधी एक चांगली मैत्रिण तर कधी सुखा-दुःखातील सहभागी असणारी पत्नी, कधी सासू तर कधी शेजारी, तर कधी आपल्या कार्यालयातील सहकारी. प्रत्येक रूपात प्रत्येकाच्या सुखा-दुःखात ती खंबीरपणे साथ देते. परंतु तरीही समाजातील अहंकारी वृत्तीपायी तिला अबलाच मानले जाते. कारण आजची स्त्री शिक्षणाने, कर्तृत्वाने स्वावलंबी झाली तरीही ती सुरक्षित आहे का ? हा प्रश्न तर अजूनही पडतोच.

आजही बऱ्याच ठिकाणी स्त्रीच्या अस्तित्वावर मर्यादा आणल्या जातात. त्यांच्या इच्छा, आकांक्षा चार भिंतीआड दडपुन टाकल्या जातात. आपल्या आजूबाजूला आपण कित्येक मुलींशी छेडछाड, विनयभंग, बलात्कार, हुंडाबळी, एकतर्फी प्रेम संबंध, मानसिक दबाव यांसारख्या गोष्टींच्या शिकार झालेल्या अनेक मुली, स्त्रिया पाहतो ज्या या सर्व गोष्टींमुळे नैराश्याकडे वळतात व आपले जीवन संपवतात. ह्याला जबाबदार असते समाजाची संकुचित विचारवृत्ती.

कित्येकदा मुलींची, स्त्रियांची छेडछाड, विनयभंग, मारहाण यासारखे प्रकार होत असताना आपल्यापैकी कित्येकजण फक्त बघायची भूमिका घेतात किंवा मोबाईलवर त्याचे व्हिडीओ बनवत असतात पण प्रत्यक्षात एखाद-दुसरा माणूस हा प्रकार थांबविण्यासाठी पुढे सरसावतो. आपल्यावर कोणत्याही प्रकारचे संकट येऊ नये म्हणून आपण समोर घडणाऱ्या घटनेकडे अगदी सहज दुर्लक्ष करतो. असे कितीतरी व्हिडीओ आपणास मोबाईल अथवा टी.व्ही वर सर्रास पहायला मिळतात. समोर असणारी मुलगी आपल्या मुलीसारखी, बहीणीसारखी आहे किमान एवढी माणुसकी तरी आपण दाखवली पाहिजे व अशा भेकड वृत्तीला ठेचले पाहिजे.

मुखवट्यातल्या नराधमांची
इथे उगवते रोज दिवाळी
तुझ्या नशिबी मात्र उजाड
धगधगती होळी
स्त्री जन्मा ही तुझी कहाणी!

बलात्कार शब्द तर खूप खराब वाटतो ना ऐकायला. विचार केला तर काय दयनीय अवस्था झाली आहे आपल्या भारताची. आज आपल्या भारतात स्त्री सुखरूप नाही तर काही हक्क नाही आपल्याला कपाळी चंद्रकोर लावून छत्रपती शिवाजी महाराज की जय म्हणत मिरवायचा. शिवरायांच्या रयतेत स्त्री सुखरूप होती. कोणाची हिम्मत नव्हती तिच्याकडे वाकड्या नजरेने बघण्याची पण आज भारतातील कित्येक आई वडील सुखाने झोपू शकत नाहीत की माझी मुलगी सुखरुप घरी परत येईल की नाही. ज्या विश्वासाने स्त्रीला आम्ही आदिशक्ती, माता, जननी असे म्हणतो मग तीची प्रतिमा घरापुरतीच मर्यादित का ठेवतो. माझी बहीण असेल तर लढायचं आणि दुसऱ्याची असेल तर आम्हाला काय करायचं. का असा विचार आणतो.

आमचा पुरुषार्थ फक्त घरच्यांना काय बोलतो तेव्हा जागरूक होतो का? स्त्री ही संधी नसून ती जबाबदारी आहे हे का आपण समजून घेत नाही. का आमचे विचार तिच्या कपड्यापुरतेच मर्यादित होऊन बसलेत. कधी विचार केलाय का? की हा कपड्यांचा नाही विचारांचा फरक आहे आणि आमचे विचार पुढे खालचे आले की आम्ही दोषमात्र त्यांच्या कपड्यांना देतो. भारत माझा देश आहे सारे भारतीय माझे बांधव आहेत असे आपल्याला प्रतिज्ञेतून सांगितले जाते आणि सारे भारतीय आपले फक्त बांधव आहेत एवढेच आम्ही लक्षात ठेवलं त्यात भगिणी ही असतात हेच आम्ही विसरलो आणि म्हणूनच कदाचित स्त्रियांच्या बाबतीत अनेक वाईट घटना घडत असतील. मग मेणबत्त्या जाळून काय उपयोग जाळायला तर पाहिजेत ते दुष्ट विचार जे हे कृत्य करण्यासाठी प्रवृत्त करतात.

एखादी गोष्ट जोपर्यंत आपल्या जीवनात घडत नाही तोपर्यंत आपल्याला त्या प्रसंगाचे गांभिर्य कळत नाही; पण मग हा प्रश्न पडतो आपण आपले संरक्षण करण्यास कधी शिकणार आहोत? कारण दरवेळेस कोणीतरी आपली मदत करेल तेव्हाच आपली संकटातून सुटका होईल ही मुलींची, स्त्रियांची झालेली मानसिकता लहानपणापासू-नच बदलली पाहिजे. आपल्या देशातील स्त्रीयांचे म्हणजेच राजमाता जि:जाबाई, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राणी लक्ष्मीबाई एवढच कशाला आयपीएस अधिकारी किरण बेदी यांसारख्या रणरागिणींची कथा सांगितल्या पाहिजेत.

बदलत्या काळानुसार अनेक चांगल्या-वाईट गोष्टी घडतच असतात. परंतु आजची पिढी चांगल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून वाईट गोष्टींचा स्वीकार जलदगतीने करतात. अहो संस्कार आणि संस्कृती शिकवणारे पालक आपणच असतो. वाईट कृत्य करताना ही मध्य मुले आपल्या आई-वडीलांची शिकवण, सर्व संस्कार सारे काही विसरतात व फक्त वाईट वृत्तीपायी अनुचित प्रकार करतात. मात्र याची शिक्षा त्या स्त्रिला आणि तिच्या घरच्यांना मिळते. आजूबाजूची लोक संबंधित मुली, स्त्रियांना अगदी त्यांच्या कुटुंबियांना देखील टोमणे मारून, त्यांना त्रास देऊन जगणे नकोसे करतात. असा हा आपला समाज आहे.

अशावेळी मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले पाहिजे. त्याचबरोबर शासनाने देखिल अशा गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना गुन्ह्याची खातरजमा करून वेळ न दवडता कठोर शिक्षा दिली पाहिजे. अशा प्रसंगांना आळा घालण्यासाठी इमरजन्सी टोल

फ्री क्रमांक, वुमेन सेफ्टी ॲप्लिकेशन यांसारख्या माध्यमांचा वापर केला जातो; पण स्त्रियांनी ही जर कोणताही गैरप्रकार घडत असेल तर स्वसंरक्षणासाठी प्रयत्न करावे. त्याचबरोबरीने समाजातील सुजाण नागरिक आणि आपली सामाजिक जबाबदारी म्हणून तरी एखाद्या मुलीच्या जीवाचे बरे वाईट झाल्यानंतर फक्त हळहळ व्यक्त करून, रस्त्यावरून मेणबत्त्या घेऊन फिरण्यापेक्षा अशी कोणती गैर घटना तुमच्या डोळ्यासमोर घडत असल्यास वेळीच ती घटना रोखण्याचा प्रयत्न करा. तरच आपली स्त्री बिनधास्तपणे कोणत्याही निर्बंधांशिवाय व भीतीशिवाय घराबाहेर पडू शकतील आणि तेव्हाच आपण म्हणू शकू स्त्रिया स्वावलंबी असण्यासोबतच आपल्या देशात सुरक्षित देखील आहेत.

अब्रू राखण्या ना कृष्ण आता
दंड देण्यास ना शिवबा आहे....
उठ, उठ घे तलवार हाती
सहनशीलता अन् शौर्याचे तू गीत आहे....

धन्यवाद !